# राज्य निवडणूक आयोग
## महाराष्ट्र

१ ला माळा, नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग, मुंबई- ४०० ०३२.


---

(प्रसिद्धिपत्रक) दि. २४ मे २०१९

### बुटीबोरी नगरपरिषदेसाठी
### २३ जून रोजी मतदान
### विविध ठिकाणच्या रिक्तपदांसाठीही मतदान

मुंबई, दि. २४ (रानिआ): नवनिर्मित बुटीबोरी (जि. नागपूर) या नगरपरिषदेची सार्वत्रिक; तसेच विविध नगरपरिषदा/ नगरपंचायतींमधील २३ रिक्तपदाच्या; तर मानवत (जि. परभणी) या नगरपरिषदेच्या अध्यक्षपदाच्या पोटनिवडणुकीसाठी २३ जून २०१९ रोजी मतदान व २४ जून २०१९ रोजी मतमोजणी होईल, अशी माहिती राज्य निवडणूक आयुक्त ज. स. सहारिया यांनी आज येथे दिली.

श्री. सहारिया यांनी सांगितले की, नामनिर्देशनपत्रे ३० मे २०१९ ते ६ जून २०१९ या कालावधीत दाखल करता येतील. २ व ५ जून २०१९ रोजी शासकीय सुट्टीमुळे नामनिर्देशनपत्रे स्वीकारण्यात येणार नाहीत. ७ जून २०१९ रोजी नामनिर्देशनपत्रांची छाननी होईल. अपील नसलेल्या ठिकाणी १३ जून २०१९ ही नामनिर्देशनपत्रे मागे घेण्याची अंतिम मुदत असेल. अपील असलेल्या ठिकाणी न्यायालयाच्या निकालाच्या तिसऱ्या दिवसापर्यंत नामनिर्देशनपत्रे मागे मागे घेता येतील. २३ जून २०१९ रोजी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० या वेळेत मतदान होईल. मतमोजणी २४ जून २०१९ रोजी होईल.

**नगरपरिषदा/ नगरपंचायतनिहाय पोटनिवडणूक होणाऱ्या रिक्त जागांचा तपशील:** **बारामती** (जि. पुणे)- ५ ब, **दुधनी** (सोलापूर)- २ अ, **नांदगाव** (नाशिक)- ७ ब, **देवळा** (नाशिक)- ११, **श्रीरामपूर** (अहमदनगर)- ९ ब, **संगमनेर** (अहमदनगर)- १० अ, **जामखेड** (अहमदनगर)- १४, **दोंडाईचा-वरवाडे** (धुळे)- ८ अ, **सोयगाव** (औरंगाबाद)- १६, **अंबाजोगाई** (बीड)- ४ अ, **सोनपेठ** (परभणी)- १ ब, **मानवत** (परभणी)- अध्यक्ष, **हिंगोली** (हिंगोली)- ११ ब, **जळगाव-जामोद** (बुलढाणा)- ८ अ, **दारव्हा** (यवतमाळ)- २ अ, **मोहाडी** (भंडारा)- ४, ९ व १२, **लाखांदूर** (भंडारा)- १६, **देवरी** (गोंदिया)- ११, **कोरपना** (चंद्रपूर)- १५, **मूल** (चंद्रपूर)- ६ अ, **भामरागड** (गडचिरोली)- ५ आणि **भामरागड** (गडचिरोली)- १६.

०-०-०

(Jagdish More, PRO, SEC)